30/9/2015

# कृषि विषय समितीचे दिनांक ३०/०९/२०१५ च्या सभेचे कार्यवृत

## कार्यवृत्त भाग-१

दिनांक ३०/०९/२०१५ ला मा. सौ अरुणाताई गोरले सभापती कृषि विषय समिती या सभेत हजर नसल्याने त्यांचे वतीने उपस्थित सर्व कृषि समिती सदस्यांचे अनुमतीने मा. सौ. मंदाताई गवई स. सदस्या यांचे अध्यक्षतेखाली कृषि विषय समितीची सभा दिनांक ३०/९/२०१५ दुपारी १:०० वा. कृषि विभाग, जिल्हा परिषद अमरावती यांचे कक्षात त्यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सभेत उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य व इतर संलग्न विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती हजेरीपुस्तकात नोंदविण्यात आलेली आहे .

आजच्या सभेचे मा. सभापती यांनी गणपुर्ती झाल्याने सभेस उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन कृषि विकास अधिकारी तथा सभेचे सचिव या नात्याने त्यांना सभा सुरु करण्याचे सुचित केले .

कृविअ :- आजचे विषय सूचीप्रमाणे पहीला विषय मागिल सभा दिनांक २७/८/२०१५ च्या सभेचे कार्यवृत भाग-१ व भाग-२ चे सभेपुढे वाचन करुन कायम करणे .त्यानुसार सभेत कार्यवृत्त भाग १ व २ चे वाचन करण्यात आले .

मागील सभेचे कार्यवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

मा. सभापती :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

सर्वप्रथम सभेस उपस्थित सर्व स. सदस्यांना दिनांक १ ते ४ ऑक्टोबर २०१५ दरम्यान वरुड येथे आयोजीत होणाऱ्या राष्ट्रीय कृषि व संत्रा कृषि महोत्सव प्रदर्शनीचे निमंत्रण पत्रिका देण्यात आल्या. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अमरावती कार्यालयामार्फत प्रकाशीत करण्यात आलेल्या शेतकऱ्यांसाठी माहीतीपुस्तीकेचे वितरण करण्यात आले.

मागील सभेत दिलेल्या सूचनेनुसार पंचायत समिती स्तरावरील सर्व कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी यांना सभेत बोलाविण्यात आलेले आहे. करीता प्रथम तालुकानिहाय आढावा घेण्यात यावा.असे मा. कृषि विकास अधिकारी यांनी सूचविले त्यावर मा. सभापती यांनी सहमती दर्शविली.

श्री उईके कृअ अमरावती यांनी अमरावती तालुक्याचा आढावा देतांना सांगीतले की, [redacted] सन २०१५-१६ मधे अनुसूचीत जाती उपयोजनेत १७५ अर्ज,ओटीएसपी २५ अर्ज प्राप्त झालेले होते . मागील वर्षी ६ विहीरी पुर्ण करण्यात आल्या. संत्रा पिक संरक्षणासाठी पंचायत समिती स्तरावर किटकनाशके वाटप सुरु आहे. सोयाबिन पिक परिस्थीती अत्यंत खराब असून उत्पन्न कमी येईल , कपाशीची पातेगळ सुरु आहे. जिल्हा परिषद सेस फंडातील औजारे वाटप पुर्ण करण्यात आलेले असून विघयो मधील औजारे वाटप सुरु असल्याचे त्यांनी सांगीतले.

भातकुली तालुक्याचा आढावा श्रीमती वानखडे मॅडम यांनी दिला . त्यांचे तालुक्यात सोयाबिन मधे तक्रारी प्राप्त होत आहे. उशिरा पेरणी झालेल्या सोयाबिनचे उत्पन्न कमी येत आहे.

दर्यापूर येथे २ बायोगॅस संयंत्र सुरु केल्याबाबत श्री भायेकर कृअ यांनी सांगीतले .तसेच विघयोमधे अपात्र ठरलेले लाभार्थी विशेष प्रयत्न करुन शेतकऱ्यांना मुदत देवून अर्जातील त्रुटीची पुर्तता करुन घेण्यात येत असल्याचे सांगीतले .

धारणी येथे १३ डिझेल इंजिन शिल्लक असल्याबाबत सांगण्यात आले . अंजनगाव सू. येथे ११० नग पाईप व ८ नग पेट्रो डिझेल इंजिन शिल्लक असून त्याचे वाटप तातडीने करण्यासाठी सूचविण्यातआले. तसेच अचलपूर येथे १५ नग पावर स्प्रेअर्स शिल्लक असल्याचे सांगण्यात आले.

वरुड तालुक्यात संत्रा पिक संरक्षणासाठी प्राप्त किटकनाशके साठा मोठया प्रमाणात प्राप्त झालेला असून त्याचे वाटप सुरु असल्याचे श्री पाटील विअ यांनी सांगीतले.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाचे श्री मोरे तंत्र अधिकारी यांनी रब्बी हंगामात हरभरा पिकाचे ७१ प्रकल्प १०० हेक्टर प्रति प्रकल्प प्रमाणे प्रत्येक तालुक्यात ८ ते ९ प्रकल्प देण्यात आलेले आहे. यामधे बियाण्याचा पुरवठा महाबीज व एनएससी कडुन होणार असून एकुण १०५७० क्वि बियाणे अनुदानावर वाटप करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांनी स्वतः विकत घेवून त्यांचे खात्यात अनुदान जमा करण्यात येणारी योजना यावर्षी राबविण्यात येणार असून यामधे ७५ नग रोटाव्हेटर चा लाभ देण्याचे लक्षांक देण्यात आलेले आहे.

क्रॉपसॅप योजनेतून १०० लिटर ट्रायझोफॉस किटकनाशक कपाशी , तुर व सोयाबिन पिकावरील किड नियंत्रणासाठी पुरवठा करण्यात आलेले आहे. सदर योजना तालुका कृषि अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात येत आहेत.

अनुसूचीत जाती उपयोजनेत काही लाभार्थी अर्जातील त्रुटीमुळे अपात्र ठरले अशा लाभार्थीने केलेला अर्ज वाया जावू नये म्हणून त्रुटीची पुर्तता करुन घेवून त्याचा समावेश पुरवणी यादीत करण्यात यावा असे सौ संगीताताई चक्रे स. सदस्या यांनी सुचविले.

महावितरण च्या गावंडे मॅडम अभियंता यांनी सांगीतले की विशेष घटक योजनेच्या निधीतून शेतीचे विद्युत कनेक्शन देण्याचे कामे मोठया प्रमाणात सुरु असून माहे डिसेबर २०१५ अखेर पर्यंत पुर्ण करावयाचे आहे. टेंडर झालेले आहे.परंतु सध्या शेतात पिके असल्यामुळे शेतकरी कामे करु देत नाही. २३९ पेंडींग कनेक्शन आहेत. तसेच सोलर विद्युत पंपाकरीता सर्वे करावयाचा असून परफॉर्मन्स टेस्ट घेण्यात येत आहे . ज्या शेतकऱ्याकडे ५ एकर जमीन आहे व विद्युत कनेक्शन नाही तसेच सिचन विहीर आहे अशा शेतकऱ्यांना सोलर विद्युत पंप देण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. करीता या योजनेत अर्ज करण्यास शिफारस करावी असे सूचविले.

रब्बी हंगामात खते व बियाण्याची मागणी नोंदविण्यात आलेली असून त्यानुसार गहु व हरभरा बियाण्याची [redacted] उपलब्धता राहील. तसेच खतामधे टंचाई जाणवणार नाही असे कृविअ यांनी सांगीतले.

योजनेअंतर्गत पुरवठा करावयाच्या साहीत्यापैकी पिव्हीसी पाईपकरीता एमएसएसआयडीसी चे दरकरार प्राप्त नाहीत.तथापी मार्केटींग फेडरेशनकडुन पिव्हीसी पाईपकरीता दरकरार झालेले आहेत. तसेच ताडपत्रीचे दर केंद्रीय भांडाराचे प्राप्त आहेत.उद्योग विभागाचे दरकरार प्रलंबित आहेत. विद्युत पंप संचाचे दर सन २०१३-१४ मधील दरकरारानुसार पुढील दरकरार होईपर्यंत लागु असल्याने त्या दराने पुरवठा करता येवू शकतो. करीता याबाबत सर्वानुमते योग्य तो निर्णय घेवून समितीची मान्यता असावी असे कृविअ यांनी सूचविले

तसेच सभेच्या विषय सूचीवर सन २०१५-१६ मधे जिल्हा परिषद सेस फंडातून वाटप करावयाच्या कृषि साहीत्याकरीता लाभार्थीची निवड करावयाची आहे . पंचायत समिती स्तरावरील यादया प्राप्त आहेत. सदर यादयामधून कृषि विषय समितीने पात्र लाभार्थीचे निकषानुसार लाभार्थी निवडीस मान्यता प्रदान करावी असा प्रस्ताव कृषि विकास अधिकारी यांनी सभेत मांडला .

यावर सन २०१५-१६ मधे जिल्हा परिषद सेस फंडातून वाटप करावयाच्या कृषि साहीत्याकरीता लाभार्थीची निवड ही पुढील सभेत करण्यात यावी असे मा. सभापती यांनी सूचीत केले. तसेच पुरवठा करावयाच्या कृषि साहीत्याचे नमुने कृषि समितीसमोर ठेवण्यात यावे. नमुने पाहुन गुणवत्तापुर्ण कृषि साहीत्याची मागणी नोंदविण्यात यावी असे मा. सभापती यांनी सूचविले.